


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७५२ . वा | शुक्रवार | दि. २६ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

# लोकसभा निवडणुकीत तुपकरांची राजकीय शिकार करणारच

## आमदार संजय गायकवाड यांचा गर्भित इशारा...

## मतदान झाल्यावर तडाखेच ?तडाखे बसल्यावर निवडणुकीचे नाव सुद्धा काढणार नाही

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वतःला शेतकरी नेता म्हणवून घेत शेतकऱ्यांसाठी लढण्याचे नाटक करणारे रविकांत तुपकर यांची राजकीय शिकार केल्याशिवाय आपण शांत बसणार नाही, असा इशारा आमदार संजय गायकवाड यांनी दिला. लोकसभा निवडणुकीत जनता तुपकरांना त्यांची औकात दाखवून देईल, असा विश्वासही गायकवाड यांनी व्यक्त केला आहे. एकीकडे लोकसभेचे मतदान तोंडावर आलेले असताना गेल्या काही दिवसांपासून अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर व आमदार संजय गायकवाड यांच्यात जोरदार कलगीतुरा रंगला आहे. दोघेही एकमेकांवर प्रचंड तोंडसुख घेत आहेत. रविकांत तुपकर यांनी दोन दिवसांपूर्वी झालेल्या एका सभेत संजय गायकवाडांसह शिवसेनेवर जोरदार आरोप केले होते. त्या आरोपांना उत्तर देत आमदार संजय गायकवाड यांनी तुपकरांवर जोरदार शरसंधान केले. रविकांत तुपकर हे एकीकडे शेतकऱ्यांचा कैवार घेतात, तर दुसरीकडे शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्यात मदत करतात, असा आरोप गायकवाडांनी केला. रविकांत तुपकर हे तोडीबाज नेते आहेत. एकीकडे ते शेतकऱ्यांच्या हिताबाबत बोलतात तर दुसरीकडे मात्र शेतकऱ्यांच्या विरोधात भूमिका घेतात. तुपकर माझ्यावर जे जमीन बळकावण्याचे आरोप करीत आहेत, ते धादांत खोटे आहेत. मी कोणाचीही जमीन बळकावली नाही. उलट मी महापुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी स्वतःची जमीन विकून लाखो रुपये दिलेले आहेत. मी अनेक वर्षांपासून राजकारण करतो परंतु कधीही राजकारण असल्या घाणेरड्या पातळीवर नेले नाही. जिल्ह्यात महायुतीची थेट लढत ही महाविकास आघाडीशीच आहे. तुपकर हे विनाकारणच स्वतःला लढतीमध्ये दाखवत आहेत. माझी हवा असल्याचे तुपकर जनतेला खोटे सांगत आहेत, असा आरोपही गायकवाड यांनी केला. रविकांत तुपकर विनाकारण आपल्या आई-वडिलांना स्टेजवर आणून जनतेला विनाकारण भावनिक आवाहने करीत आहेत. रविकांत तुपकर माझ्या शिकारीवर बोलतात, परंतु त्यांना मी सांगू इच्छितो की, मी जीवनात वाघासारखाच जगलो आहे. राजकारणात मोठा संघर्ष केला आहे. माझ्या आईवडिलांकडून मला संघर्षाचा वारसा व शिकवण मिळाली आहे. त्यामुळे तुपकरांनी विनाकारण माझ्या शिकारीवर बोलू नये. मी एव्हढे निश्चित सांगतो की, या निवडणुकीत रविकांत तुपकर यांची राजकीय शिकार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.



गायकवाड म्हणाले की, तुपकरांनी विनाकारण भाजप-शिवसेनेच्या अंतर्गत बाबींवर बोलू नये. आमचे आपसात काही मतभेद झाले तरी आम्ही आमचे मतभेद आमच्या घरातच मिटवू. आम्ही एकाच परिवारातील आहोत, त्यात बाहेरच्यांनी विनाकारण लक्ष देण्याची गरज नाही. शेतकऱ्यांना लुबाणाऱ्या गाढे बंधूंना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या व शेतकऱ्यांच्या बायकांचे मंगळसूत्र हिसकणाऱ्या व्यक्तीने आमच्या वाटेला जाऊ नये, असा गर्भित इशाराही गायकवाडांनी दिला आहे. गायकवाड म्हणाले की, मी माझ्या आयुष्यात नगरसेवकपदापासून ते नगराध्यक्षपदापर्यंत आणि आमदारकीपर्यंतच्या निवडणुका लढल्या आहेत. निवडणुका लढवताना काय संघर्ष करावा लागतो, ते मला चांगले माहिती आहे. त्यामुळे मला तुपकरांनी कसलेही राजकीय शहाणपण शिकवू नये. यंदाच्या निवडणुकीत तुपकरांना त्यांची जागा दाखवून दिल्या जाईल, असा इशाराही गायकवाडांनी दिलेला आहे.

# महाराष्ट्रात आज आठ जागांसाठी होणार मतदान...

**वृत्तसंस्था/मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्या अंतर्गत आज महाराष्ट्रातील आठ मतदारसंघात मतदान होणार आहे या टप्प्यात दलित मुस्लिम व कुणबी मराठा हा डी एम के फॅक्टर निर्णयांक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पूर्वी विदर्भातील लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर आता अकोला अमरावती बुलढाणा वर्धा यवतमाळ वाशिम हिंगोली नांदेड व परभणी या आठ मतदारसंघाकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. येथे २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे यापैकी पाच जागा पश्चिम विदर्भात तर तीन जागा मराठवाड्यात आहे. पश्चिम विदर्भातील अमरावती अकोला बुलढाणा वर्धा व यवतमाळ वाशिम या जागेवरील उमेदवारांचे भवितव्य त्यांच्या जातीय समीकरणावर आधारित आहे. खैरलाजी हत्याकांडाला एक दशकाहून अधिकचा काळ लोटला आहे पण पश्चिम विदर्भातील दलित मतदारावर त्यांचा अजूनही प्रभाव आहे उल्लेखनीय म्हणजे अमरावती लोकसभा मतदारसंघाची विभागणी बौद्ध व बिगर बौद्ध उमेदवारांच्या धरतीवर करण्यात आली आहे. यात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटातील ज्येष्ठ नेत्यांचा समावेश आहे अमरावतीत नवनीत राणा मैदानात अमरावती लोकसभा मतदारसंघात काँग्रेसने आंबेडकरवादी सामाजिक कार्यकर्ते बळवंत वानखेडे यांना मैदानात उतरवले आहे. ते भाजपचे उमेदवार नवनीत राणा यांचा सामना करतील राणा नुकत्याच भाजपमध्ये सहभागी झाल्यात याशिवाय एनडीएच्या नेतृत्वाखाली महायुतीचा घटक पक्ष असणाऱ्या प्रहार संघटनेचे दिनेश बबोही अमरावतीच्या मैदानात उतरले आहे याद्वारे बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्या विरोधात दंड थोपटलेला आहे याच प्रकारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे नेते माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनाही येथे नवनीत राणा यांच्या विरोधात दंड थोपटलेला आहे यामुळे नवनीत राणा यांच्यापुढे अनेक आव्हान आहेत अमरावतीत हा मतदारसंघ कुणबी बहुल मतदार संघ असल्याने येथील उमेदवारांच्या विजयात या समुदायाच्या मतदारांची भूमिका निर्णायक असणार आहे. अकोला मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर भाजप उमेदवार अनुप धोत्रे व काँग्रेस उमेदवार डॉक्टर अभय पाटील यांच्या तिरंगी लढत होणार आहे या मतदारसंघात मुस्लिम मतदारांचा आकडा २०% आहे त्यामुळे प्रकाश आंबेडकरांचा या मतावर डोळा आहे विशेष अल्पसंख्याक समुदाय हा काँग्रेसचाही पारंपारिक मतदार मानला जातो त्यामुळे काँग्रेसचे ही या मतदारावर डोळे आहेत. बुलढाणा आणि यवतमाळ वाशिम या दोन लोकसभा मतदारसंघात यावेळी शिवसेना विरुद्ध ठाकरे सेना अशी लढत होणार आहे एकनाथ शिंदे गटाचे विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांना पुन्हा एकदा पक्षाने बुलढाण्यातून मैदानात उतरलेले आहे त्यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते नरेंद्र खेडेकर यांनी आव्हान दिले आहे खेडेकर हे उद्धव ठाकरे यांचे निष्ठावंत मानले जातात त्यांना त्यांचा फायदा होण्याची शक्यता आहे तर प्रतापराव जाधव यांना ठाकरे सोबतच्या कथित गद्दारीचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघावर बंजारा व कुणबी मतदारांचे वर्चस्व आहे त्यामुळे त्यांची मते येथे निर्णायक ठरण्याची शक्यता आहे शिवसेनेचे शिंदे गटाचे नेत्या भावना गवळी यांनी या तब्बल पाच वेळा या मतदारसंघाचे नेतृत्व केले पण यंदा पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारले येथून खासदार हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना उमेदवारी देण्यात आले त्यांचा सामना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजय देशमुख यांच्याशी होईल या मतदारसंघातील निकाल मराठा व ओबीसीच्या मतावर अवलंबून असल्याचा दावा केला जात आहे. वर्धा लोकसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान खासदार रामदास तडस यंदा आपली हॅट्रिक करण्याच्या तयारीत आहे त्यांचा सामना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अमर काळे यांच्याशी होणार आहे येथेही कुणबी मराठा व ओबीसीची मते निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बाटलीबंद पाण्यामुळे पाणपोईकडे फिरविली पाठ





**जनसंचलन/खामगाव**

काही वर्षांपूर्वी कोणत्याही गावात, शहरात गेले तर पाणपोई दृष्टीस पडत होती. आता मात्र बाटलीबंद पाणी संस्कृतीच्या काळात पाणपोई लावण्याकडे सामाजिक संघटनांनी पाठ फिरविली आहे. एप्रिलच्या पूर्वी अनेक ठिकाणी पाणपोईची उन्हाळा म्हटला की, प्रत्येकाच्या अंगाची लाही लाही हो-ते. या काळात तहानलेल्यांना पाणी पिण्यास दिले तर पुण्य मिळते, अशी समजूत जनतेमध्ये होती. त्यामुळे रस्त्याच्या बाजूला पाणपोई लावून पुण्य मिळवण्यासोबत सामाजिक कार्याचा एक भाग म्हणूनसुद्धा अनेक लोक ही सेवा देत होते. मार्च महिनाअखेर आणि होती. सुरुवात व्हायची. आता मात्र पाणपोई कुठेही दिसून येत नाही. त्याउलट प्रत्येक ठिकाणी बाटलीबंद पाणी विक्रीसाठी दिसून येते. पाणपोईमुळे सर्वसामान्य नागरिकांची तहान भागवली जात होती. हे सामाजिक कार्य अनेक संस्था करत होत्या. बसस्थानक, रेल्वे स्थानक किंवा गावातील चौकामध्ये उन्हाळा सुरू झाला की, पाणपोई दृष्टीस पडत मात्र आता कुठेच त्या दिसत नाही. पुर्वी आठवडी बाजार असल्या की सुध्दा मोठ्या प्रमाणात पाणपोई दिसत होत्या बाहेर खेड्यापाड्यातून येणाऱ्या लोकांची तहान याद्वारे भागविल्या जात होते .विशेष आजच्या युगातील फ्रिजच्या पाण्या पेक्षा किंवा आरोच्या पाण्यापेक्षा थंड आणि चांगली चव या पाण्याची लागत होती.तहान या पाण्याद्वारे जात होती.मात्र आजच्या या युगात पाणपोई हि दिसेना अशी झाली आहे

# जनतेच्या पाठीवर हात ठेवा,विकास द्या,आधार द्या ते तुम्हाला कधीच अंतर देणार नाही - पंकजाताई मुंडे

## सिंदखेडराजातील लोकांना प्रेम द्या ते तुम्हाला प्रेम देतील

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

पाच वर्षानंतर आपण निवडणुकीत येतो, प्रचारात येतो आणि पाच वर्षानंतर आपल्याला लोकांची आठवण झाली की लोकं आपल्याला विचारतात कोठे होते? काय झालं? काय केले? मलाही विचारतात परंतु, लोकसभेत असताना जनतेच्या प्रश्नांचे उत्तर देणे व त्यांचं समाधान करणे हे आपलं कर्तव्य आहे. प्रतापराव जाधव यांनी सिंदखेडराजा मतदारसंघातील जनतेच्या पाठीवरून हात फिरव-ावा, त्यांना विकास द्यावा, त्यांना आधार द्यावा येथील जनता तुम्हाला कधीच अंतर देणार नाही व तुम्हाला कशाचीच कमतरता राहणार नाही. तसेच खासदार झाल्यानंतर विकासाची सुरुवात सिंदखेडराजातून करावी. असेही शेवटी पंकजाताई म्हणाल्या.

सिंदखेडराजा मतदार संघातील जन-तेशी स्व. गोपीनाथ मुंडे यांचे खूप जुने ऋणानुबंध आहे.डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी सांगितल्याप्रमाणे मी लोकनेतेची कन्या आहे आणि लोकनेत्याची कन्या असल्याने कोणाचे वाईट होऊ नये असे वाटते तर त्याला पाठबळ देण्याची माझी काम आहे. प्रतापराव जाधव आपण येथील जनतेला प्रेम दिले तर हे सुद्धा तुम्हाला प्रेम देतील असे सांगत विश्वास दर्शविला. माझ्यासारख्या सामान्य व वंचित माणसाला साधे काहीच राहिलेले नाही. लढाई करताना टोकाची लढाई करावी लागते. काम कितीही करा.




विकास कितीही करा. कितीही शक्ती पक्षाला द्या. पण शेवटी समाजाच्या वंचितांच्या लढाईमध्ये उतरून ती लढाई लढाईच लागते. असा खोचक सवाल उपस्थित करून त्यांनी मागील पाच वर्षांचा लेखाजोखाच जणू मांडला.

मुंडे साहेब २०१४ मध्ये गेल्यानंतर माझा खरा संघर्ष सुरू झाला. संघर्ष यात्रा काढली. यावेळी जनतेने भरभरून आशीर्वाद दिले. त्यावेळी ग्रामविकास मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली. ज्याप्रमाणे परळीचा विकास केला त्याचप्रमाणे मी सिंदखेडराजाचा विकासही केला. परंतू २०१९ च्या निवडणुकीत माझा पराभव झाला. मागील पाच वर्ष पुलाखालून बरेच पाणी वाहिले म्हणत त्यांनी खूप त्रास झाल्याचा अस्पष्ट उल्लेख केला. त्यामुळे माझ्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा जीव भांड्यात पडला होता. त्यामुळे माझ्या सभांचा, बैठकांचा एवढा प्रभाव राहिला नसेल किंवा गरज पडणार नाही असे वाटत होते. पाच वर्षे कोणतेही काम नसताना तुम्ही मला ऊर्जा दिली आशीर्वाद दिले. असेही त्या म्हणाल्या.

यावेळी मंचावर आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे, श्वेता महाले, शिवसेना नेत्या ज्योती वाघमारे, माधवी नाईक, माजी आमदार तोताराम कायंदे, डॉ शशिकांत खेडेकर, विजयराज शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश सचिव इरफानअली शेख, डॉ.गणेश मांटे, सिद्दीक कुरेशी, प्रभाकर ताठे, बळीराम मापारी, डॉ.सुनील कायंदे, गजेंद्र देशमुख हे उपस्थित होते.

# अखिल भारतीय मराठा महासंघाचा खा. प्रतापराव जाधव यांना पाठिंबा

**जनसंचलन/बुलढाणा**

नहायुतीचे अधिकृत उमेदवार खासद-ार प्रतापराव जाधव यांना अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे या संदर्भात अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने पत्रक जाहीर करण्यात आला आहे यामध्ये पाठिंबाचे कारणे हे स्पष्ट करण्यात आले आहे. या पत्रात स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे की महाराष्ट्रात महायुती सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा विद्यार्थ्यांच्या सरकारच्या विविध खात्यामध्ये निवड झाल्या होत्या. परंतु आरक्षण रद्द झाल्यामुळे त्यांना नियुक्तीपासून वंचित ठेवण्यात आले होते. मात्र शासनाने धाडसी निर्णय घेऊन जवळपास २२०० मराठा विद्यार्थ्यांना पद ग्रहण कायद्यानुसार नियुक्त्या दिल्या. तेव्हा अखिल भारतीय मराठा महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष कैलासवासी शशिकांतराव पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून त्यांचे कौतुक केले. एवढेच नव्हे तर नुकतीच झालेल्या मराठा आंदोलनामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी न्यायमूर्ती शिंदे समिती स्थापन करून सर्व सरकारी खात्याला कुणबी नोंदी शोधण्याचे आदेश दिले. आज रोजी जवळपास ५७ लाख कुणबी नोंदी सापडल्यात. तसेच यापुढेही शोध मोहीम सुरू ठेवण्यात येणार आहे, तसेच सरकारने त्वरित सापडलेले नोंदी यांना कुणबी दाखले देण्याचे आदेश दिले आहेत. अखिल भारतीय मराठा महासंघाने २५ जुलै २०२३ रोजी जंतर- मंतर नवी दिल्ली येथे आरक्षणाची मर्यादा वाढून महाराष्ट्रातील मराठा आणि भारतातीलक्षत्रिय समाजास संविधानिक आरक्षण द्यावे यासाठी उपोषण करण्यात आले होते. ही मागणी महायुतीने मान्य करून केंद्रामध्ये नरेंद्र मोदी सरकार आल्यानंतर महायुतीने



वरील मागणीचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे करिता बुलढाणा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार यांना जाहीर पाठिंबा देण्याचा उल्लेख यात करण्यात आला आहे. मराठा समाजाचे प्रश्न सोडवणाऱ्यांना समाज सदैव पाठीशी राहील, असे आश्वासन हे दिले. या पत्रावर राष्ट्रीय अध्यक्ष दिलीपद-ादा जगताप, राष्ट्रीय उपाध्यक्ष संतोष नानवटे, राष्ट्रीय सरचिटणीस संभाजीराजे दहातोंडे आदींचे हस्ताक्षर आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# संदीप शेळकेंसाठी सासुरवाडी अन् लेकराच्या विजयासाठी मायभूमी एकवटली...

**जनसंचलन/बुलढाणा**

यंदाची लोकसभा निवडणूक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक होण्याची चिन्हे आहेत. कधी नव्हे एवढा अपक्षांचा जोर या निवडणुकीत दिसू लागला. अपक्ष उमेदवार संदीप शेळके जोरदार चर्चेत आहेत. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतांना प्रचाराचा टेम्पो त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवलाय. संत नगरी शेगाव येथून अधिकृतरित्या प्रचाराचा शुभारंभ करण्यापूर्वीच संदीप शेळके यांनी परिवर्तन रथयात्रेच्या माध्यमातून जिल्हा पालथा घातला होता. प्रचार कालावधीत संदीप शेळके यांच्या रोड शो, कॉर्नर सभा आणि बैठकांना मिळालेला प्रतिसादच बोलका आहे. आज २४ एप्रिलला प्रचाराच्या शेवटच्या दिवशी संदीप शेळके यांनी जन्मभूमी शिरपूर आणि सासुरवाडी डोंगरखंडाळा येथील मतदारांच्या गाठी भेटी घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी दोन्ही ठिकाणी शेळके यांना उदंड प्रतिसाद आणि प्रेम मिळाले. डोंगरखंडाळा येथे तर लाडक्या जावईबापूंना अक्षरशः डोक्यावर घेतले.. अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांच्या प्रचाराचा धुमधडाका जिल्हाभर पाहायला मिळाला आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात सासुरवाडी डोंगरखंडाळा आणि जन्मभूमी शिरपूर येथे आज संदीप शेळकेंची भव्य प्रचार रॅली निघाली होती. जावयाच्या प्रचारासाठी सासुरवाडी डोंगरखंडाळा आणि जन्मभूमी शिरपूर एकवटल्याचे चित्र होते. अपक्ष उमेदवार तथा वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी जिल्हाभर झंझावाती प्रचार केला. विकासाचे व्हिजन घेवून निघालेल्या शेळकेंना सामान्य जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. याआधी परिवर्तन रथयात्रेच्या माध्यमातून त्यांनी जिल्हा पिंजून काढला आहे. विशेष म्हणजे विकासाच्या मुंद्यावर निवडणूक लढत असल्याने संदीप शेळकेंना भरभक्कम प्रतिसाद मिळत आहे. आज निघालेल्या प्रचार रॅलीत डोंगरखंडाळा,



शिरपूर ग्रामस्थांनी शेळके यांचे जंगी स्वागत केले.मातृभूमीचे ऋण फेडण्यासाठी जिल्ह्याचा कायापालट करून दाखवेल, सुशिक्षित तरुणांना रोजगार मिळावा यासाठी खासदार झाल्यावर सगळ्यात आधी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी उभारण्याचे काम करू, शेतकऱ्यांच्या कल्याण करणाऱ्या योजना कार्यान्वित करू ,सर्वांगीण विकासाच्या विविध योजना प्रत्यक्षात उतरवून जिल्ह्याचा कायापालट करून दाखवणार असल्याच्या भावना यावेळी शेळके यांनी व्यक्त केल्या. शिरपूर आणि डोंगरखंडाळा या दोन्ही गावांचे माझ्यावर खूप उपकार आहेत, ते मी कधीही विसरणार नाही असे म्हणताना संदीप शेळके भावूक झाले होते.

# लोकसभेच्या मतदानासाठी ४३ बसेस व १० खाजगी जीप मतदान केंद्राकडे रवाना...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने ०५ बुलढाणा लोकसभा मतदार संघामध्ये मतदानाच्या तयारीची प्रक्रिया आज पूर्ण झाली आहे . २४ सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात बुलढाणा लोकसभा निवडणुकीसाठी आज दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी, मा.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाकरिता आवश्यक असलेल्या ई. व्ही. एम. मशीन आणि इतर साहित्य मतदान चमू ला वाटप करण्यात आले आहे. सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ३३६ मतदान केंद्रे आहेत,दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासनाची सर्व तयारी झाली आहे, आज सिंदखेड राजा येथून मतदान साहित्य झोनल अधिकाऱ्यांच्यामार्फत मतदान



केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांना देण्यात आले आहे. हे सर्व साहित्य ४३ बसेस तसेच १० खाजगी जीप च्या माध्यमातून मतदान चमू ला मतदान केंद्रापर्यंत आज पोहचवण्यासाठी दुपारी सर्व वाहने रवाना झाली आहेत. उद्या एकूण ३३६ मतदान केंद्रावर होणाऱ्या मतदानासाठी ४३ बस,६६ खाजगी जीप,५९३ पोलीस कर्मचारी आज मतदान केंद्राकडे रवाना झाली आहेत. मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, मा. तहसीलदार सिंदखेड राजा प्रवीण धानोरकर, मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा मनोज सातव, मा. नायब तहसीलदार डॉ. अस्मा मुजावर, मा. नायब तहसीलदार नितीन बढे,मा. गटविकास अधिकारी देऊळगाव राजा मुकेश महोर, मा. गटविकास अधिकारी सिंदखेडराजा डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, मा. मुख्याधिकारी सिंदखेडराजा प्रशांत व्हटकर, मा. मुख्याधिकारी देऊळगाव राजा अरुण मोकळ, प्रसार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, उमेश गरकळ, प्रकाश शिंदे, संजय सोनुने, राजेंद्र खरात तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# चैत्र नवरात्री उत्सव निमित्त कारंजा चौक दुर्गा माता मंदिर समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन...



**जनसंचलन/बुलढाणा**

चैत्र नवरात्र उत्सव निमित्त कारंजा चौक दुर्गा माता मंदिर समितीच्या वतीने बुलढाणा शहरात कारंजा चौक येथे दि २५ एप्रिल रोजी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या महाप्रसादाचा असंख्य भक्तांना लाभ घेतला. कारंजा चौक दुर्गा उत्सव समितीतर्फे चैत्र नवरात्री उत्सव तसेच रामनवमी उत्सव व हनुमान जन्मोत्सव हा मागील ५१ वर्षापासून कारंजा चौक समिती साजरा करीत आहे. कारंजा चौक मित्र मंडळ, कारंजा चौक व्यापारी मंडळ व कारंजा चौक दुर्गा समिती या सर्वांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या स्वरूपात महाप्रसाद म्हणून भंडाऱ्याचे आयोजन करण्यात येते. कारंजा चौक हे मागील ५१ वर्षापासून ही प्रथा निरंतर सातत्याने साजरी करीत आहे यामध्ये बुलढाणा शहरातील महिला, भावी भक्तगण सहपरिवार येत असतात. असेच हे कार्य आणि सातत्याने सुरू ठेवू असे करंजा उत्सव समितीचे सदस्य श्री व्यास यांनी दैनिक जनसंचलन बोलताना सांगितलं

# कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे नेते चंद्रशेखर धंदरे यांचा काँग्रेस मध्ये प्रवेश

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा लोकसभेच्या प्रचारासाठी काँग्रेसचे नेते खासदार मुकुलजी वासनिक जिल्हा दैऱ्यावर आले असता बुलडाणा सहकार विद्या मंदीरच्या सभाग्रुहात मध्ये जिल्हा कार्यक्रता मेळावा आयोजित केला होता त्या कार्यकर्त्या मेळाव्यात बुलडाणा जिल्हा कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे व अनुसूचित जमाती जमाती परिसंघाचे नेते बुलडाणा जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त वरिष्ठ लेखाधिकारी चंद्रशेखर धंदरे यांनी आपल्या हाजारो कार्यकर्त्यांन सह खासदार मुकुलजी वासनिक यांच्या कार्यावर विश्वास ठेवून प्रवेश केला यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा.आमदार राहूल बोंद्रे, माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ,काँग्रेसचे नेते विजयजी आंभेरे,ॲड. गणेशसिंग राजपूत, दिपक रिंढे, एनअसयूईयचे माजी प्रदेशाध्यक्ष ॲड. संजय राठोड, काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा कामगार नेते लक्ष्मणदादा घुमरे, संतोष आंबेकर, दादूशेट,रसिदखॉ जमादार, जिल्हा प्रभारी नाना गावंडे, काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस जयश्री शेळके, जिल्हा सचिव सुनिल सपकाळ, बुलडाणा जिल्हा एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष शैलेश खेडकर इत्यादींच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला.

खासदार मुकुलजी वासनिक यांनी त्यांचा कांग्रेसचा दुपडा व पुष्प गुच्छ देवून स्वागत करून प्रवेश घेतला.



चंद्रशेखर धंदरे यांचे सामाजिक कार्याच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत असताना सुध्दा कामे केली, चंद्रशेखर धंदरे यांनी जिप बुलडाणा कास्ट्राईब कर्मचारी संघटना आक्रमकपणे चालवून हाजरे कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला, आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी मोठे आंदोलन उभारून शेकडो कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला. कर्मचाऱ्यांच्या अन्याय ग्रस्त कर्मचाऱ्यांच्या बढत्या बदल्या प्रशासनासी झगडून न्याय मिळवून दिला व आजही ते कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देत आहे. त्यांच्या या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याची व त्यांनी केलेले शेकडो आंदोलन त्यांचे चर्चेचे ठरलेले आहेत. त्यांचे अस्तित्व संघटनेच्या माध्यमातून अन्यायग्रस्त कर्मचाऱ्यांना न्याय देत त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केलेली होती आजही करीत आहे. त्या सामाजिक कार्यातून आता राजकिय कार्य असा त्यांचा प्रवेश सुरू झाला आहे.

# भाजपने केवळ सभा रद्द केली नाही तर लोकशाहीवर घाला घातलाय, राणा नवरा-बायकोला जागा दाखवू : बच्चू कडू

**वृत्तसंस्था/ अमरावती**

अमरावती लोकसभेचे प्रहारचे उमेदवार दिनेश बूब यांच्या प्रचारासाठी मैदानाची लेखी परवानगी असताना देखील बळजबरीने आणि पोलीस प्रशासन हाताशी धरून वेळेवर सभेची परवानगी रद्द केली जाते आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या सभेसाठी मैदान हिसकावून घेतले जाते. त्यांनी केवळ दिनेश बूब यांची सभा रद्द नाही केली तर लोकशाहीवर खऱ्या अर्थाने घाला घातला, अशी सडकून टीका प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा आमदार बच्चू कडू यांनी केली. पद आणि पैशाच्या जोरावर राणा दाम्पत्य आपल्यासारख्या लोकांना जर त्रास देत असेल तर भविष्यात सर्वसामान्य आणि गोरगरीब लोकांचे हाल ते केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे लोकशाही वाचविण्यासाठी राणा दाम्पत्याला त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली असल्याचे देखील बच्चू कडू म्हणाले. अमरावतीमधील सायन्स कोअर मैदानातील सभेवरून मंगळवारी बच्चू कडू आणि पोलिसांमध्ये तू तू मै मै झाल्यानंतर पुन्हा वाद उद्भवू नये यासाठी दोन पावले मागे घेत प्रहारने जिल्हा स्टेडियमवर हजारो प्रहार कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जाहीर सभा घेतली. सर्वसामान्य कार्यकर्ता असलेले दिनेश बूब यांनी जिल्ह्यातील प्रचारात घेतलेली आघाडी विरोधकांच्या मानगुटीवर बसली असून विरोधक चवताळले आहेत. त्यामुळे आपली सभा होऊ नये यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू असल्याचे बच्चू कडू म्हणाले. हनुमान जयंतीला कार्यकर्त्यांना हजार पाचशे रुपयांचे आमिष देऊन हनुमानगढीवर बोलावणे यावरून राणा दाम्पत्याने भाजपची संस्कृती पायदळी तुडवून भाजप संपविण्याचा डाव आखला असल्याची टीका राणा यांनी केली.दरम्यान आमदार राजकुमार पटेल यांनी राणा दाम्पत्यासह विरोधकांवर चौफेर फटकेबाजी केली. दिनेश बूब यांचा विजय निश्चित आहे. ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. दिनेश बूब विजयाच्या समीप असून दोन नंबरवर काँग्रेस आणि भाजपची ओढाताण सुरू आहे. आमचे आदिवासी बांधव स्वाभिमानी आहेत. राणा दोन कोटींच्या गाडीत जाऊन सतरा रुपयांची साडी वाटतात, यांना आता आदिवासी बांधव उत्तर दिल्याशिवाय राहणार नाहीत. मतदारांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्यावर काल झालेल्या अन्यायाला मतपेटीतून व्यक्त होण्याचे आवाहन देखील याव-ळी पटेल यांनी केले.राणा दाम्पत्याच्या आणि प्रशासनाच्या हुकूमशाहीला विरोध करण्याच्या दृष्टीने प्रहारच्या वतीने शहरातून यात्रा काढली होती. त्यानंतर जिल्हा स्टेडियमवर आ. बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनात मोठी सभा पार पडली. या सभेला आ. राजकुमार पटेल, डॉ.नयना कडू, उमेदवार दिनेश बूब, रफिक सेठ, संजय देशमुख, बंटी रामटेके यांच्यासह असंख्य मान्यवर मंडळी उपस्थिती होती.या सभेसाठी जिल्ह्यातील अनेक भागांमधून प्रहार कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने उपस्थित झाले होते.अमरावती लोकसभा मतदारसंघातील प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवार दिनेश बुब यांनी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी अमरावतीत पदयात्रेच्या माध्यमातून विराट शक्ती प्रदर्शन करीत धनशक्तीविरुद्धच्या लढाईत हम किसीसे कम नही याची प्रचिती करून देत आपण विजयाच्या समीप असल्याचे सांगितले.



## आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचा बुलढाणा येथील विद्यार्थी, निकेतन कमलिक, याने जेईई मेन २०२४ मध्ये भारत पातळीवर ७५०८ क्रमांकावर

**जनसंचलन/बुलढाणा**


आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड चाचणी पूर्वतयारी सेवांमध्ये राष्ट्रीय अग्रेसर असून, संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) मुख्य २०२४ च्या दुसऱ्या सत्रात त्यांच्या बुलढाणा-स्थित विद्यार्थ्याने केलेल्या अपवादात्मक कामगिरीचे अभिमानाने अनावरण केले. AESL चा विद्यार्थी निकेतन कमलिक याने ९९.५३ पर्सेंटाइल मिळवून भारत पातळीवर ७५०८ क्रमांक मिळवले आहे. या विद्यार्थ्याच्या उत्कृष्ट कामगिरीतून त्यांचे अथक परिश्रम तसेच त्यांचे या अत्यंत आव्हानात्मक परीक्षेतील विषयांबद्दलचे सखोल ज्ञान अधोरेखित होते. राष्ट्रीय परीक्षा मंडळाने काल रात्री घोषित केलेल्या निकालात जाहीर झालेल्या या विद्यार्थ्यांच्या यशामुळे उत्कृष्टतेचा नवा मापदंड नोंदला गेला आहे. आकाश च्या प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहून शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतलेल्या या अपवादात्मक गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी च्या संयुक्त प्रवेश परीक्षेत यशस्वी होण्यासाठी वाटचाल सुरू केली आहे. ही परीक्षा जगभरातील अत्यंत अवघड प्रवेश परीक्षांपैकी एक मानली जाते. या विद्यार्थ्यांचे यश ही त्यांची विविध विषयांमधील मूळ संकल्पना आत्मसात करण्याची निष्ठेने केलेली धडपड आणि शिस्तबद्ध अभ्यास याला मिळालेली ही पावती आहे. आपली मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करताना ते म्हणाले, आमच्या या यशाचे श्रेय आकाश ने अत्यंत काटेकोरपणे तयार केलेल्या अभ्यासक्रमाला आणि मार्गदर्शनाला जाते. त्यांच्याकडून सातत्याने मार्गदर्शन मिळाले नसते तर अतिशय कमी वेळात विविध विषयांत प्रावीण्य मिळवणे ही एक अत्यंत आव्हानात्मक प्रक्रिया होऊन बसली असती. AESL च्या शैक्षणिक आणि व्यवसाय विभागाचे प्रमुख श्री अमित सिंग राठोड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. श्री राठोड म्हणाले, या विद्यार्थ्यानी मिळविलेले यश आकाश ने विद्यार्थ्यांना सर्वंकष मार्गदर्शन करण्यासाठी आणि कल्पक शिक्षण पद्धतीचा अवलंब करून त्यांची स्पर्धात्मक परीक्षांमधील गुणवत्ता उंचावण्यासाठी केलेल्या अविश्रांत परिश्रमाचे यश आहे. त्यांच्या भविष्यातील उत्तम कामगिरीसाठी आमच्या त्यांना शुभेछा.फ्र संयुक्त प्रवेश परीक्षा (मुख्य परीक्षा ) (JEE ) दोन सत्रात घेतली जाते ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची कामगिरी सुधारण्याची संधी मिळते. (JEE



(Advanced)) प्रगत परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सारख्या प्रख्यात संस्थांमध्ये प्रवेश घेण्याची संधी मिळते तर (JEE (Main)) मुळे विविध राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थांचे दरवाजे त्यांच्यासाठी खुले होतात.(JEE (Advanced)) परीक्षा देण्यासाठी (JEE (Main)) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. आकाश तर्फे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्या-र्थ्यासाठी खास तयार केलेले इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अभ्यासक्रम शिकविले जातात. अलीकडे आकाश ने संगणकाधारित प्रशिक्षणावर अधिक भर द्यायला सुरुवात केली आहे. आकाश च्या आय ट्यूटर या प्रणालीत विद्यार्थ्यांना त्यांना सुसंगत असलेल्या गतीने शिकणे आणि जर काही सत्रे चुकली असतील तर ती पुन्हा अभ्यासणे शक्य झाले आहे. याशिवाय प्रत्यक्ष परीक्षेच्या धरतीवर घेतल्या जाणा-या चाचण्या विद्यार्थ्यांचा परीक्षेबद्दलचा आत्मविश्वास वाढवतात.

## नंबर दोनचे धंदे माझे सगळे व्यवहार रेकॉर्डवर खैरेंचं डिपॉझिट वाचलं तरी बरं होईल- भुमरेंचा पलटवार

**वृत्तसंस्था/छत्रपती संभाजीनगर**



छत्रपती संभाजीनगर लोकसभेसाठी शिवसेनेकडून (शिंदे गट) संदिपान भुमरे यांना उमेदवारी दिल्यानंतर, आता खऱ्या अर्थाने निवडणूक प्रचाराला रंग चढताना दिसत आहे. महत्वाचे म्हणजे, शिवसेनेच्या फुटीनंतर, छत्रपती संभाजीनगरात शिवसेना विरुद्ध शिवसेना, अशी लढत पहिल्यांदाच होणार आहे. या लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत दोन्ही शिव-सेनेचे नेते एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत. चंद्रकांत खैरे यांनी वैजापूरमध्ये टक्केवारीचे पैसे आणि दारूची दुकानं म्हणत भुमरेंवर निशाणा साधला होता. त्यावर आता भुमरे यांनीही पलटवार केला आहे. यासंदर्भात बोलताना भुमरे म्हणाले, चार तारखेला कळेल, कुणी टक्केवारी घेत-ली? काय घेतली? आणि जिल्ह्यातले कार्यकर्ते सांगतील ना भुमरेंनी किती पैसे घेतले. खैरे तर आरोप करणारच. खैरेंकडे दुसरं राहिलंच काय? खैरेंनी हे सांगावं की, भुमरेने विकासाची कामं केली नाहीत. भुमरे पालकमंत्री असताना, कॅबिनेटमंत्री असताना महाराष्ट्रात, जिल्ह्यात, शहरात काम केलं नाही, ही कामं सांगा. हे काय आहे, टक्केवारी खाल्ली, टक्केवारी घेतली. याला काही पुरावा आहे का? राहिला विषय व्यवसाय कुणी कोणता करावा? किती करावा? हे सर्व रेकॉर्डला आहे. आरोप करायला काही लागत नाही. पण कुणी कोणता व्यवसाय करावा, काय करावा, हा ज्याचा त्याचा विषय आहे. मला एक सांगायचे आहे, नंबर दोनचे धंदे करत नाही. हे शासन मान्य आहे. आम्ही शासनाला महसूल भरतो. म्हणून मला सांगायचं आहे की रेकॉर्डला सर्व काही आहे. आता खैरेंच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. खैरेंचं संतुलन बिघडलं आहे. आज त्यांना कळेल त्यांची परिस्थिती काय आहे ते? जेव्हा आम्ही भाजप शिवसेना सोबत होतो, तेव्हा त्यांची रॅली कशी निघत होती? खैरेंच्या सभा कशा होत होत्या? आणि आज त्यांची परिस्थइती कशी आहे? असा प्रश्न भुमरे यांनी केला. ते एक वृत्तवाहिनी सोबत बोलत होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958